रयत शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज वाशी

## साहित्यमंच आयोजित व्याख्यान
## "आनंदी आनंद गडे"

## अहवाल

दिनांक 19 डिसेंबर 2020 रोजी साहित्यमंच आयोजित 'आनंदी आनंद गडे' या विषयावर मा. श्रुती देसाई राजे मॅडम यांचेऑनलाइन व्याख्यान आयोजित करण्यात आले.प्रत्येकाचे आनंद मिळवण्याचे मार्ग वेगळेअसतात. छंद, काम, वाचनव दुःखयामध्ये स्वतःचा आनंद कशात आहे हे स्वतःला शोधता आले पाहिजे याची अनेक उदाहरणे देऊन त्यांनी स्पष्ट केले. वेदनेतून मिळणारा आनंद, मातृत्व आनंद, एक धागा सुखाचा शंभर धागे दुःखाचे, सुखी माणसाचा सदरा, आनंद माणसाच्या मनामध्ये असतो, तुज आहे तुज पाशी परी तू जागा चुकलासीअशी अनेक उदाहरणे दिली.कार्यक्रमाची सुरुवात व पाहुण्यांची ओळख साहित्य मंच कमिटी अध्यक्ष श्रीमती माया कळविकट्टे यांनी करून दिली व पाहुण्यांचे आभार श्री बी जी लेंगरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी हा कार्यक्रम स्टाफसाठी आयोजित करण्यात आला.

कमिटी चेअरमन

प्राचार्य


KBP College Vashi - Calendar
Meet - sAHITYA MANCH
Google
meet.google.com/cmo-tyfc-zke?authuser=1
sAHITYA MANCH
People (13)
Chat
Add people
Host controls
IN CALL
Ms. Kalvikattee M... (You)
archana pradhan
Balasaheb Lengare
Mr. Sarang S.M. KBPColl...
Ms Kumbhar S.S. KBPC...
Ms. Dhole S. P KBPColle...
Vidhu's Kingdom
Ms. Kamble K.T. KBPCollege
Shruti Desai - Raje
Tanaji Jadhav
Sonal Gaikwad
Balasaheb Lengare
Sangeeta Naik
vajida baig
Ms Kumbhar S.S. KBPCollege
16:22:12
19-12-20



रयत शिक्षण संस्थेचे

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज वाशी, नवी मुंबई

(स्वायत्त महाविद्यालय)

साहित्य मंच कमिटी आयोजित

## मराठी भाषा दिन कार्यक्रम - २ मार्च २०२१

### अहवाल

मंगळवार दिनांक ०२ मार्च २०२१ रोजी सकाळी ११:३० वाजता रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या बॅरिस्टर पी. टी. पाटील सभागृहात मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला.

समारंभाचे अध्यक्षस्थान कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.शुभदा नायक मॅडम यांनी भूषवले होते. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डी जी बोटे सर मंचावर उपस्थित होते. साहित्य मंच कमिटीच्या अध्यक्षा प्रा. माया कळविकट्टे मॅडम या देखील मंचावर उपस्थित होत्या. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून धुळे येथील प्रा. डॉ. प्रकाश पाठक हे ऑन-लाइन उपलब्ध होते. त्याच बरोबर कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

साहित्य मंच कमिटी द्वारे आयोजित मराठी राज भाषा दिन साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने शनिवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ रोजी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये हस्ताक्षर स्पर्धा, म्हणी व वाक्प्रचार स्पर्धा, गोष्ट सांगणे स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या व २ मार्च २०२१ रोजी व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. सदरील कार्यक्रम हा ऑन-लाइन व ऑफ-लाइन गुगल मीट या माध्यमाद्वारे घेण्यात आला. त्याला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

प्रारंभी प्रा. माया कळविकट्टे यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकामध्ये कार्यक्रमाची रूपरेषा व मराठी भाषा दिनाचे महत्व सांगितले. त्यानंतर सूत्रसंचालन प्रा. लेंगरे सर यांनी केले व सर्वांचे मनपूर्वक स्वागत केले. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. उपस्थित पाहुण्यांचा गुलाब पुष्प देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. त्यानंतर प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले डॉ. प्रकाश पाठक यांनी 'साहित्यातील सौन्दर्य' या विषयावर आपले विचार व्यक्त केले. आपल्या व्याख्यानात त्यांनी मराठी वाङ्:मयाला लाभलेली थोर परंपरा प्राचीन ते आधुनिक साठ्याचा प्रवास, त्यामध्ये अनेक लेखकांनी दिलेल्या योगदानाचा आढावा घेण्यात आला. सौन्दर्याची व्याख्या त्यांनी उलगडून दाखवली. साहित्याचे स्वरूप किती विस्तृत आहे आणि त्यातील सौन्दर्याचा गोडवा त्यांच्या व्याख्यानातून स्पष्टपणे दिसून आले. अनेक उदाहरणे व दाखले देऊन साहित्यातील विविध सौन्दर्याची जणू मेजवानीच त्यांनी श्रोत्यांसमोर मांडली. साहित्यातील विविध पैलूंना स्पर्श करीत उलगडा केला.

साहित्य मंच कमिटीद्वारा आयोजित विविध स्पर्धांमध्ये यश प्राप्त केलेल्या स्पर्धकांना मंचावर उपस्थित अध्यक्ष व उपप्राचार्य यांच्या हस्ते पारितोषिक व प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोपात आभार प्रदर्शन प्रा. अमोल नगराळे यांनी केले. शेवटी राष्ट्रगीत म्हटले गेले आणि अध्यक्ष्यच्या परवानगीने हा कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला असे जाहीर करण्यात आले.

Myeek

कमिटी चेअरमन

(माया कळविकट्टे)

प्राचार्य

(डॉ. शुभदा नायक)







